जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक १५.१०.२०२५**

‘ अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे या घटकाने ठाणे शहरात ‘‘नशा मुक्ती शाळा’’ अभियाना अंतर्गत श्रीमती सुलोचना देवी सिंघानिया शाळेच्या एकुण २,५०० विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केलेबाबत.’

मा.पोलीस आयुक्त, ठाणे यांनी अंमली पदार्थ विक्री/सेवन संदर्भात जनजागृती विशेष मोहीम राबवण्याबाबत आदेश दिले होते. त्या अनुषंगाने डॉ.श्री.पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे व श्री.अमरसिंह जाधव पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे यांनी सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने श्री.रविंद्र दौंडकर, सहा.पोलीस आयुक्त, प्रशासन, ठाणे यांच्या सुचनेप्रमाणे अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राहुल मस्के यांनी विशेष मोहिम राबविली होती.

‘‘नशामुक्त भारत’’ अभियान अंतर्गत ठाणे पोलीस आयुक्तालयातील अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे यांनी विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी एक महत्तवपुर्ण पाउल उचलले आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या वतीने नशामुक्त शाळा या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या अभियान अंतर्गत दिनांक ०६/१०/२०२५ ते दिनांक १३/१०/२०२५ या कालावधीत ठाणे शहरातील श्रीमती सुलोचना देवी सिघांनिया या शाळेमध्ये अंमली पदार्थ सेवन व विक्री चे दुष्परिणाम या संदर्भात इयत्ता ०६ वी ते १० वी मधील एकुण २५०० विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठया उत्साहाने सहभाग घेत नशामुक्त जीवनाची शपथ घेतली आहे. या उपक्रमाचे नेतृत्व पोलीस उप निरीक्षक दिपक डुम्मलवाड यांनी केले असुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल मस्के यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांच्या दुष्परिणामा विषयी माहिती देण्यात आली. तसेच व्हिडीओ, फोटो व पी.पी.टी. च्या माध्यमातुन नशेमुळे होणारे शारीरीक, मानसीक व सामजिक परिणाम दाखविण्यात आले. यावेळी पोलीस उप निरीक्षक दिपक डुम्मलवाड यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आजची तरूण पिढी ही देशाचे भविष्य आहे पण व्यसनाधीनतेचा धोका या भविष्याला अंधारात ढकलतो तसेच प्रत्येक शाळा नशा मुक्त झाली तरच समाज सदृढ बनेल. तसेच विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रलोभनला बळी न पडण्याचे आणि अंमली पदार्थाचा वापर करणारे विषयी पोलीसांना माहिती देण्याचे आवाहन पोलीस उप निरीक्षक दिपक डुम्मलवाड यांनी केले. श्रीमती सुलोचना देवी सिंघानिया शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ.रेवती श्रीनिवासन व शिक्षकांनी अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या या उपक्रमाचे स्वागत केले.

अंमली पदार्थ विक्री, साठवणुक, वाहतुक, सेवन करणे हा अपराध असुन यामध्ये सहभागी असलेले इसमांबाबत कोणतीही माहिती उपलब्ध असल्यास अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर येथे द्यावी.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर